# - पोलीस शिपाई / भरती २०१८ -

# पोलीस अधीक्षक कार्यालय बीड

पोलीस अधीक्षक बीड यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व www.beedpolice@gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- शासन निर्णय, गृहविभाग, क्रमांक जेएलई-२०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१, दि.१५/०१/२०१६ नुसार कारागृह विभागातील कारागृह शिपाई ही पदे पोलीस विभागातमार्फत भरण्यात येणार आहेत. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या तरतुदी कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासही लागू करण्यात आलेल्या आहेत.
- उमेदवारास (१) पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई / बॅन्डस्मन, (२) लोहमार्ग पोलीस बलातील पोलीस शिपाई, (३) राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई / बॅन्डस्मन व (४) कारागृह विभागातील कारागृह शिपाई अशा विविध पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारण्यात येईल. विविध पदांसाठी विविध ठिकाणी शारीरिक चाचणी / लेखी परीक्षा होणार आहे. अर्ज भरलेल्या दोन घटकांतील परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही. त्यामध्ये बदल करता येणार नाही. एकाच घटकातील एकाच पदासाठी दोन अर्ज करण्यास मुभा नाही. असे आढळल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
- कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदांची भरती प्रक्रिया ही, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रा./पुणे ग्रा./नागपूर ग्रा. या पोलीस घटकांमार्फत घेण्यात येईल.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची शारीरीक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारीरीक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावरेश झालेल्या उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या / पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**स्वाक्षरीत**

**( जी. श्रीधर )**

पोलीस अधीक्षक बीड

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१८
## घटक- बीड

**जाहिरात क्रमांक ०१/२०१८** **ठिकाण-बीड** **दिनांक ०५/०२/२०१८**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र. ३०२/तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये), महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष)(सेवाप्रवेश) नियम-२०१२ व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार **बीड जिल्हा पोलीस दलात** रिक्त असलेल्या पदांना शासनाने मंजुरी दिल्या प्रमाणे, रिक्त असलेली १०० टक्के पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) **पोलीस शिपाई :**

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | ६ | ९ | १ | २ | २ | - | ४ | - | २९ | ५३ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | ५ | १ | १ | १ | - | २ | - | १० | २३ |
| महिला | २ | ३ | - | १ | १ | - | १ | - | ९ | १७ |
| खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| माजी सैनिक | १ | १ | - | - | - | - | १ | - | ४ | ७ |
| अंशकालीन पदवीधर | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पोलीस पाल्य | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| गृहरक्षक दल | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **एकुण** | **६** | **९** | **१** | **२** | **२** | **-** | **४** | **-** | **२९** | **५३** |

२) अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१८ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, १९९९- भाग-३ मधील नियम ४० व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

ड) सध्या पोलीस विभागात वाहन चालकाची पदे स्वतंत्र्यरित्या भरली जात नसल्यामुळे पोलीस शिपाईपदी नियुक्ती झाल्यावर संबंधित पोलीस विभागात वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहिल. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

इ) **पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.**

ई) **या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकासाठी रिक्त पदे नाहीत.**

**३)** महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी **पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/ तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. तसेच,** राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी **महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) (सेवाप्रवेश) नियम-२०१२ हे नियम लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह** mahapolice.mahaonline.gov.in **या संकेत स्थळावर (Home Page) वर व *beedpolice@gov.in* वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.**

**४) आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ:-**

जाहिरातीत नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार खाली दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरु शकतात. आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक, वेळ व ऑनलाईन पद्धतीतील आवेदन अर्ज mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ***दिनांक ०६.०२.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१८ रोजी रात्री २४.०० वा. पर्यंत*** भरावेत. विहित मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल. उमेदवारांना पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेबाबतची माहिती, रुपरेषा (Schedule) mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

जाहिरातीत नमुद अटींची पात्रता / अर्हता पुर्तता करणारे उमेदवार यांनी खाली दिलेल्या विहित दिनांकाच्या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरावेत.